ला. प्र. वि.

अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १७/०७/२०२५




## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २३/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. हरिकृष्णा आदिमुलम, वय ३२ वर्षे, कामगार, नगर अभियंता खाते, म.न.पा., एम/पुर्व विभाग, गोवंडी, मुंबई |
| पाहिजे आरोपी लोकसेवक | श्री राहुल कांबळे, कनिष्ठ अभियंता, नेमणुक- एम पुर्व विभाग, म.न.पा., गोवंडी, मुंबई |
| लाचेची मागणी | रू.५०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडी अंती रु. २०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांनी गौतम नगर, गोवंडी, मुंबई येथे बांधकाम करण्याचे काम घेतले होते. सदरचे बांधकाम १४ फुटाच्या वर केल्याने त्यावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता लोकसेवक राहूल कांबळे, कनिष्ठ अभियंता व लोकसेवक हरिकृष्णा आदिमुलम, एम/पुर्व विभाग, मुंबई यांनी तक्रारदार यांच्याकडे रू. ५०,०००/- लाचेची मागणी करून, तडजोडी अंती रू. २०,०००/- स्विकारण्याचे मान्य केले. परंतु तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १६/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार अर्ज केला होता.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १६/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक हरिकृष्णा आदिमुलम व लोकसेवक राहुल कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे अनधिकृत बांधकामावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता रू. २०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक हरिकृष्णा आदिमुलम यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. २०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. गणपत परचाके, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. चंद्रकांत माळी, सहायक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

अपर पोलीस उप-आयुक्त

( अनिल तुकाराम घेरडीकर)
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net